| MHKO070005742009 | नियमित दिवाणी दावा क्र.१०३/२००९<br>सुबोध कल्लाप्पा मगदुम<br>विरुध्द<br>मा.मुख्याधिकारी जयसिंगपूर नगरपरिषद, जयसिंगपूर<br>आणि इतर |
|---|---|

निशाणी क्र.७१ खालील आदेश

अर्ज वाचला. त्यावरील म्हणणे वाचले.

२. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी क्र.२ ते ५ व ८ ते ११ यांनी प्रस्तुत अर्जात असे कथन केले आहे की, सदर कामी मे. कोर्टाने प्रस्तुत प्रतिवादी यांचा पुरावा नाही असे म्हणुन सदरचे काम आजरोजी युक्तीवादासाठी नेमलेले आहे. प्रस्तुत प्रतिवादी यांना या कामी पुरावा देणेचा आहे. सदरचा वाद हा स्थावर मिळकती संदर्भात असल्याने प्रस्तुत प्रतिवादी यांना साक्षीसमन्स ने कागद या मे. कोर्टात हजर करणे आवश्यक आहे. जेणे करुन गुणदोषावर निर्णय होण्यास मदत होणार आहे. सबब प्रस्तुत प्रतिवादी यांचे विरुध्द झालेला आदेश "पुरावा नाही" हा रद्द करुन प्रतिवादी यांना पुरावा करणेविषयी संधी दयावी अशी विनंती केली आहे. विरुध्द बाजुने सदर अर्जावरच त्यांचे म्हणणे देवुन कथन करण्यात आले आहे की, सदरचा अर्ज व त्यातील मजकुर वादीना मान्य व कबुल नाही. प्रतिवादींना संधी देवुनही त्यांनी पुरावा केलेला नाही. सदर अर्जाचे कामी कोणतेही योग्य व संयुक्तीक कारण दिलेले नाही. सबब अर्ज नामंजुर करणेत यावा. मंजुर केलेस प्रतिवादी यांचेवर जास्तीत जास्त कॉस्ट बसविणेत यावी अशी विनंती केली आहे.

३. वादीने प्रस्तुतचा दावा हा कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.२ ते ११ यांनी पुरावा दिला नसल्यामुळे त्यांचेविरुध्द दि.२०/११/२०२५ रोजी पुरावा नाही असा आदेश केलेला आहे. प्रत्येक दावा हा गुणदोषावर निकाली निघणे अत्यंत आवश्यक आहे. प्रतिवादी कथित प्रमाणे त्यांना परवानगी न दिल्यास त्यांना त्यांचा पुरावा करण्यासाठी संधी मिळणार नाही. प्रतिवादीचा अर्ज जर मंजुर केला तर विरुध्द

बाजुचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यासोबतच प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यासाठी घेतलेला वेळ पाहता सदर अर्जावर कॉस्ट लावणे हे गरजेचे आहे. करिता मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. प्रतिवादी क्र.२ ते ५ व ८ ते ११ यांचा अर्ज (नि.क्र.७१) हा त्यांनी वादी यांना रक्कम रु.१५०/-(रुपये एकशे पन्नास फक्त) देण्याच्या अटीवर मंजूर करणेत येतो.

२. सदर प्रतिवादींनी सदर कॉस्ट वादी यांना पुढील तारखेपर्यंत दयावी.

३. दोन्ही पक्षांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE

Digitally signed by AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Date: 2025.12.06 17:38:13 +0530

दि.०६/१२/२०२५ **(अ. त्रिं. मनगिरे)**

जयसिंगपूर. सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Sou. P. S. Musale. |
| Name of Court | Jt.C.J.J.D.& J.M.F.C.,<br>Jaysingpur. |
| Date of Dictation. | 06/12/2025. |
| Judgment/order signed by the PO on | 06/12/2025. |
| Judgment/order uploaded on | 06/12/2025. |